# हनी बनी बंको



# हनी बनी बंको



मराठी : अश्विनी बर्वे



## हनी बनी बंको आणि म्हातारा फाटका माणूस

हनी बनी बंको आपल्या मोठ्या भावाबरोबर एकत्र राहत होता. त्यांचे घर जंगलाच्या कडेला होते. त्याच्या भावाचे त्याच्यावर प्रेम नव्हते. तो हनी बनी बंकोला सारखं दिवसभर काम सांगत असे.

“बटाट्याच्या शेतात खण, दही घुसळ,डुक्करांची राखण कर. तू मूर्ख मुलगा आहे, हनी बनी बको!” त्याचा मोठा भाऊ अशा प्रकारे त्याच्याशी बोलत असे. म्हणून हनी बनी बंको सारखा कामात असे. तो प्रसन्न नव्हता.

एक दिवस एक म्हातारा भटका माणूस त्यांच्या घरी आला. त्याला पाणी हवं होतं. म्हातारा फाटका माणसाने पाणी प्यायला. मग त्याने हनी बनी बंकोकडे पाहिलं. “तू प्रसन्न दिसत नाहीस, तो म्हणाला, “काय झालं?”

“माझा भाऊ माझ्यावर प्रेम करत नाही,” हनी बनी बंको म्हणाला. “तो दिवसभर माझ्याकडून काम करून घेतो.”

“अच्छा,” म्हातारा भटका माणूस म्हणाला. “ही चांगली गोष्ट नाही.” त्याने आपली पोतडी उघडली आणि एक फिडेल (वाद्य) काढलं.


“हे घे,” तो म्हणाला. “तू हे फिडेल वाजव, तुला खूप आनंद मिळेल.”



“पण मला फिडेल वाजवता येत नाही,” हनी बनी बंको म्हणाला.

“जर तुझ्या मनात इच्छा असेल तर तू शिकशील,” म्हातारा भटका माणूस म्हणाला. “अच्छ.” असं म्हणून तो जंगलाच्या दिशेने गेला.

हनी बनी बंकोने फिडेल उचललं. त्याने वाजवण्याचा प्रयत्न केला. ‘चीं चीं! चाँ चाँ!’ हा तर फार भीतीदायक आवाज आहे. हनी बनी बंकोने फिडेल ठेवून दिलं.



दुसऱ्या दिवशी सकाळी जेव्हा हनी बनी बंकोचा भाऊ ओरडला, “हनी बनी बंको! मूर्ख मुला, जा बटाट्याच्या शेतात खण!”

खणता-खणता हनी बनी बंकोने आपल्या फिडेलच्या बाबत विचार केला. लगेचच त्याला आपल्या मनात एक गाणं ऐकू आलं.


‘खण, खण कर आराम

खण खण कर आराम

उलटा वळव पाय धडाम

खण, खण, कर आराम.’

“हे तर चांगलं गाणं आहे,” हनी बनी बंको म्हणाला. “मी या गाण्याचे नाव ठेवणार. “बटाट्याच्या शेताचे गाणं.” त्याने आपलं काम पूर्ण केलं आणि फिडेलवर गाणं वाजवण्यासाठी तो घराकडे पळाला.



दुसऱ्या दिवशी सकाळी हनी बनी बंकोला दही घुसळावं लागलं. जेव्हा तो दही घुसळत होता तेव्हा त्यांच्या मनात एक गाणं वाजत होतं.

‘घुसळ घुसळ थम


घुसळ घुसळ थम

घुसळ घुसळ घुसळ घुसळ

थम थम थम थम!’

तो हे गाणं फिडेलवर वाजवायला शिकला.

रोज हनी बनी बंकोला आपल्या मनात नवीन गाणं ऐकू यायचं.त्याने ‘डुकराला शोधा’ हे गाणं ऐकलं. त्याने ‘बादली साफ करा’ हे गाणं ऐकलं. त्याने ‘बुद्धू खारुताई ‘गाणं आणि ‘भाऊ ओरडला’ गाणं पण ऐकलं. लवकरच तो ही सारी गाणी आपल्या फिडेलवर वाजवू लागला.



मग एक दिवस तोच म्हातारा भटका माणूस त्याच्या घरी आला. हनी बनी बंकोने पळत जावून त्याच्यासाठी पाणी आणलं.

“धन्यवाद,” म्हातारा माणूस म्हणाला. “आता मला बघू दे तू फिडेल किती चांगले वाजवतो ते.”

हनी बनी बंको थोडा घाबरला. त्याला कोणत्यातरी कारणानं वाटलं की हा माणूस गरीब आहे. जर त्याला वाटले की हनी बनी बंको बेक्कार संगीतकार आहे तर काय? पण हनी बनी बंकोने फिडेल उचलले आणि काही काळ त्याच्या मनातली गाणी ऐकली. मग तो फिडेल वाजवू लागला. त्याने खूप वेळपर्यंत म्हाताऱ्या माणसाला गाणं ऐकवलं. मग तो थांबला.


“बस एवढंच,” तो म्हणाला, “मला एवढीच गाणी येतात.”



"तू फिडेल चांगले वाजवतो." म्हातारा माणूस म्हणाला. "आणि ही गाणी खूप सुंदर आहे, तू खूप मेहनत घेतली आहेस."

हनी बनी बंकोला आश्चर्य वाटलं. "पण मी काहीच मेहनत घेतली नाही," तो म्हणाला. "मला तर फक्त फिडेल वाजवायला आवडतं."

म्हातारा भटका माणूस हसला, "काम करण्याची ही सगळ्यात चांगली पद्धत आहे," तो म्हणाला.





## हनी बनीचे रहस्य

नाष्ट्याच्या आधी हनी बनी बंको आपलं फिडेल वाजवत असे. तो दुपारी खाल्लानंतर वाजवत असे. तो कामात असतांना मध्येच फिडेल वाजवत असे. रोज झोपण्याच्या आधी हनी बनी बंको फिडेलची हनवटी खाली दाबून फिडेल वाजवत असे.


"तू या फिडेल बरोबर जास्तच वेळ घालवत आहे," भाऊ म्हणाला. "तू अधिक काम करायला हवे. मला वाटतं तू भुईमुग लाव."


“मला तीन आठवड्यात खाण्यासाठी शेंगा पाहिजे, नाहीतर मी तुझे फिडेल घेवून टाकेन.”

“हा तर अन्याय आहे,” हनी बनी बंको म्हणाला. “शेंगा येण्यासाठी तीन आठवड्यापेक्षा अधिक काळ लागतो.”

“तो तुझा प्रश्न आहे,” त्याचा भाऊ म्हणाला आणि दाणदाण पाउलं टाकत तिथून निघून गेला.

हनी बनी बंकोने भुईमुग लावला. मग तो विचार करत बसला.शेवटी त्याला एक गोष्ट सुचली. त्याने आपले फिडेल घेतले, आणि एक खास गाणं वाजवू लागला. ते गाणं होतं, “तुमची मुळं वाढवा. खूप वाढवा, खूप वाढवा.” त्याने हे गाणं रोज वाजवलं. जमिनीत असलेल्या भुईमुगाच्या बियांनी ते ऐकलं आणि त्या झटपट वाढू लागल्या.





तीन आठवड्यानंतर हनी बनी बंकोने एका मोठ्या भांड्यात भुईमुगाच्या शेंगा भरल्या आणि भावाच्या समोर ठेवल्या.

“हे तू कसं केलं?” त्याच्या भावाने विचारलं.तो चिडला होता.

“मी खूप मेहनत केली,” हनी बनी बंको म्हणाला. “आणि माझं एक रहस्य सुद्धा आहे.”

“ठीक आहे, आता तुला अजून जास्त मेहनत करावी लागेल,” त्याचा भाऊ म्हणाला. “मला वाटतं की गायीने पहिल्या पेक्षा दुप्पट दूध द्यायला पाहिजे, कोंबड्यानी पहिल्यापेक्षा अधिक अंडी द्यायला पाहिजे आणि डुक्कर पहिल्या पेक्षा दुप्पट जाड झालं पाहिजे. हे सगळं तीन आठवड्यात झालं पाहिजे नाहीतर मी तुझं फिडेल हिसकावून घेईन.”

“हे उचित नाही,” हनी बनी बंको म्हणाला. “गाय आणि कोंबड्या आणि डुक्कर जेवढ करू शकतात तेवढं करत आहेत.”

“हा तुझा प्रश्न आहे,” भाऊ म्हणाला आणि दाणदाण पाऊलं टाकत तो तिथून निघून गेला.

हनी बनी बंकोने आपलं फिडेल उचललं आणि गोठ्यात गेला. त्याने गायीला एक खास गाणं ऐकवलं. गाण्याचे बोल होते, ‘माझी गाय, प्रेमळ गाय,’

तो कोंबड्यांच्या खुराड्यात गेला. त्याने तिथं कोंबड्यांना गाणं ऐकवलं. गाण्याचे बोल होते ‘खरडा-उकरा, किडे काढा.’

तो डुकरांच्या गोठ्यात गेला आणि त्यांना त्याने गाणं ऐकवलं. त्याचे बोल होते, ‘पाणी हुंगण्याचं गाणं’

हनी बनी बंको रोज गाय, कोंबड्या आणि डुक्कराला फिडेल वाजवून गाणं ऐकवत असे. हे गाणं ऐकून त्यांना छान वाटत असे. आणि अशा तऱ्हेने तीन आठवड्यानंतर गाय दुप्पट दूध देवू लागली. कोंबड्या दुप्पट अंडी देवू लागल्या. डुक्कर आधी पेक्षा दुप्पट जाड झाले.




“हे तू कसं केलं?” हनी बनी बंकोच्या भावाने विचारलं. तो खूप चिडल्यासारखा दिसत होता.

“मी खूप मेहनत केली,” हनी बनी बंको म्हणाला. “आणि माझं एक रहस्य सुद्धा आहे.”

“ठीक आहे, आता तुला अजून जास्त मेहनत करावी लागेल,” त्याचा भाऊ म्हणाला. “उद्यापर्यंत तू मैदानातला सगळा घास कापून त्याचा गंज करून ठेव. नाहीतर तुझं फिडेल हिसकावून घेईन.”


“हे योग्य नाही,” हनी बनी बंको म्हणाला. “घासाचे मैदान तर खूप मोठे आहे.”

“हा तुझा प्रश्न आहे,” त्याचा भाऊ म्हणाला आणि दाणदाण पाऊलं टाकत गेला.



हनी बनी बंकोने आपलं फिडेल उचललं आणि शहराकडे निघाला. तो नगराच्या मधोमध आला. मग तो फिडेल वाजवू लागला. ते गाणं होतं ‘घास कापा, गंज करा.’ ते खूप गोड गाणं होतं.

शहरात सगळ्या लोकांनी त्याचं गाणं ऐकलं. सगळ्यांना गुदगुल्या होवू लागल्या. सगळ्यांचे पाव थिरकू लागले. सगळ्यांचे हात हलू लागले. शहरात कोणी उभं राहू शकत नव्हतं. जेव्हा हनी बनी बंको घासाच्या मैदानाकडे जावू लागला तेव्हा प्रत्येक जण त्याच्या मागोमाग जावू लागला..





सगळेजण हसत होते आणि नाचत होते. सगळ्यांनी आपले गुडघे वाकवले आणि आपली पावलं थिरकवली. त्यांनी सगळा घास कापला आणि त्याचा गंज केला. वर हनी बनी बंकोने एवढं सुंदर गाणं ऐकवल्याबद्दल धन्यवाद दिले.

“सगळा घास कापला आणि त्याचा गंज बनवून दिला आहे,” हनी बनी बंको आपल्या भावाला म्हणाला.


“तू हे कसं केलं?” त्याच्या भावाने विचारलं.तो खरंच खूप चिडला होता.


“मी खूप मेहनत केली,” हनी बनी बंको म्हणाला.

"अजून एक माझं रहस्य तुला सांगतो. ते आहे माझं संगीत. पण अजून एक रहस्य तुला सांगायचं आहे. मी आता तुझ्यासाठी कोणतंही काम करणार नाही. तू खूप चिडलेला असतो. शहरात माझे काही मित्र आहेत त्यांच्याकडून उधार घेईन आणि मी माझी शेती करेन."

"पण माझं काम कोण करेन?" भावाने विचारलं.

"मला माहित नाही," हनी बनी बंको म्हणाला, "तो तुझा प्रश्न आहे."





हनी बनी बंको आणि मिल्ली बी.

हनी बनी बंकोला आपलं नवीन शेत खूप आवडे. शेतात चांगलं उत्पन्न आलं आणि जे पैसे आपल्या मित्रांना द्यायचे होते ते त्याने दिले. त्याचे पाळीव प्राणी सुद्धा प्रसन्न होते. हनी बनी बंको त्या सगळ्यांसाठी फिडेलवर आपलं खास गाणं वाजवत असे.

हनी बनी बंको मजेत होता. एक दिवस त्याने कोणालातरी फूल तोंड्तांना पाहिलं. हनी बनी बंकोला वाटलं ती एक सुंदर मुलगी आहे. त्याला तिच्याबद्दल प्रेम वाटू लागले. त्या मुलीचे नाव होते मिल्ली बी.

हनी बनी बंकोचे हृदय जोरजोरात धडकू लागले. त्याचे पाय कापू लागले. “मी त्या मिल्ली बी शी लग्न करेन.” तो म्हणाला. “मी जर तसे केलं नाही तर माझं नाव हनी बनी बंको लावणार नाही.”

पण त्याने विचार केला की त्याला असे काहीतरी करावे लागेल ज्यामुळे मिल्ली बी. त्याच्यावर प्रेम करेन. “मी असं काय केलं म्हणजे ती माझ्यावर प्रेम करेन?” हनी बनी विचार करू लागला.

“समजलं !मला काहीतरी चांगलं काम करावं लागेल.” मग तो मिल्ली बी. च्या घरी गेला आणि तिच्या बागेतले गवत कापून दिले.

ह्या कामासाठी खूप वेळ लागला आणि हनी बनी बंकोचे कपडे खराब झाले होते. शेवटी काम संपवून तो घराची घंटा वाजवण्यासाठी दाराकडे गेला.

दरवाज्यावर त्याचा भाऊ फुलांचा मोठा गुच्छ घेवून उभा होता. “हॅलो मिल्ली बी.”त्याचा भाऊ म्हणाला. “किती सुंदर फुलं आहेत! तुम्ही चहा पिण्यासाठी घरात याल का?”






“धन्यवाद,” त्याचा भाऊ म्हणाला. त्याने हनी बनी बंकोकडे पाहिलं. “निघ इथून,घाणेरड्या मुला,” तो म्हणाला. “या मुलीला त्रास देवू नको.” मग भाऊ आत गळा आणि त्याने दरवाजा बंद केला.

हनी बनी बंको घरी निघून गेला. “मी हार मानणार नाही” तो म्हणाला. “मी त्या मिल्ली बी. बरोबर लग्न नक्कीच करेन. नाहीतर माझं नाव हनी बनी बंको नाहीं.”

दुसऱ्या दिवशी हनी बनी बंकोने एक मोठ्ठा चॉकलेट केक केला. मग त्याने अंघोळ केली, सगळ्यात सुंदर कपडे घातले आणि मिल्ली बी. ला भेटायला गेला.

तो मिल्ली बी. च्या घरी पोहचणारच तेवढ्यात त्याने पाण्यात काहीतरी पडल्याचा आवाज ऐकला.
“अरे देवा!” हनी बनी बंको म्हणाला. त्याने आपला केक जमिनीवर ठेवला आणि तलावाकडे तो धावला. तलावात एक छोटं मांजर होतं. “घाबरू नको, मी तुला मदत करतोय,” हनी बनी बंकोने ओरडून सांगितलं.

त्याने तलावात उडी मारली आणि मांजराकडे पोहू लागला.पण जेव्हा तो मांजराजवळ पोहचला तेव्हा मांजर म्हणालं, “हट!” आणि पोहत दुसरीकडे निघून गेली. हनी बनी बंको मग पोहत परत आला.



त्याने डोक्याला झटका देवून आपल्या कानातून पाणी बाहेर काढलं. मग तो आपला केक शोधू लागला. पण केक तिथं नव्हता.

“काही हरकत नाही,” हनी बनी बंको म्हणाला. “मी मिल्ली बी. ला मांजराबद्दल सांगेल. ही तर मजेदार गोष्ट आहे.”

घंटा वाजवण्यासाठी तो मिल्ली बी. च्या घराच्या दरवाज्याजवळ गेला. दरवाज्याजवळ त्याचा भाऊ चॉकलेट केक घेवून उभा होता.


“हॅलो,” मिल्ली बी.ने त्याच्या भावाला म्हटलं, “किती सुंदर केक आहे! तुम्ही माझ्याबरोबर चहा प्यायला आत नाही का येणार?”

“धन्यवाद,” त्याचा भाऊ म्हणाला. त्याने हनी बनी बंकोकडे पाहिलं. “निघ इथून, ओल्या मुला.” तो म्हणाला, “या मुलीला त्रास देवू नको,” मग त्याने दरवाजा बंद करून घेतला.



हनी बनी  बंको घरी आला. त्याला समजत नव्हतं की त्याने काय केले म्हणजे मिल्ली बी. त्याच्यावर प्रेम करेन. या कारणामुळे तो उदास झाला.त्याने ती वस्तू उचलली जी त्याला नेहमी आनंद देत असे-त्याचं फिडेल. तो फिरायला बाहेर पडला.

चालता चालता त्याने त्याच्या भावनांना धरून असलेलं गाणं फिडेलवर वाजवलं. त्याने ‘पर्वता सारखे ह्दय’ गाणं आणि ‘मार्शमेलो सारखे गुडघे’ असं गाणं वाजवलं. त्याने एक गाणं वाजवलं त्याचे बोल होते, ‘भाऊ घेवून गेला माझा केक’. मग त्याने अजून एक गाणं गायलं. मग त्याने अजून एक गाणं गायलं, ‘मी खूप प्रेम करतो तुझ्यावर मिल्ली बी’. हनी बनी बंकोने शेवटचं गाणं खूप छान गायलं कारण ती त्याच्या ह्दयाची हाक होती.



"अरे, तू ही गोष्ट मला का सांगितली नाही?" हनी बनी बंकोचा आपल्या डोळ्यावर विश्वास बसला नाही. मिल्ली बी. त्याच्यासमोर उभा होता. तो चालत चालत तिच्या घरापर्यंत गेला.

हनी बनी बंकोला समजलं नाही काय बोलावं ते.

"ठीक आहे, काही हरकत नाही," मिल्ली बी.म्हणाली. "मी पण तुझ्यावर प्रेम करते. आपण लग्न कधी करायचं?"

"उद्या!" हनी बनी बंको म्हणाला. आणि त्यांनी लग्न केलं.






## मिल्ली बी. ने मार्ग दाखवला.

हिन्नी बिन्नी बंको आणि मिल्ली बी. अनेक वर्षे फार्मवर राहिले. ते आनंदी होते. ते खूप मेहनत करत असत. त्यांना पंधरा मुलं होती.

हनी बनी बंकोने आपल्या सर्व मुलांना गाणं शिकवलं. त्याने फिडेल, बासरी आणि ढोल, नगारा वाजवायला शिकवलं. त्याने सगळ्यात लहान मुलगा मेल्विनला मोठा बॉस ड्रम वाजवायला शिकवलं. आणि सगळ्यात महत्वाचं म्हणजे त्याने मुलांना हे शिकवलं की आपण आपल्या मनातलं गाणं गायलं पाहिजे.



लवकरच सगळ्या घरात संगीत ऐकू येवू लागले. प्रत्येकजण कोणतं न कोणतं गाणं वाजवत होता- फक्त - मिल्ली बी. के. ती फक्त गाणं ऐकत असे.

“तुमची आई चांगली श्रोता आहे,” हनी बनी बंको ने आपल्या मुलांना सांगितलं. “माझ्या माहितीत तर ती सगळ्यात चांगली श्रोता आहे.”

“हो, मी चांगली श्रोता आहे,” मिल्ली बी. म्हणाली. “आणि तुम्ही जे संगीत वाजवतात ते मला प्रिय आहे. पण तुम्ही सगळे एक साथ का वाजवत नाही? आपल्या बैठकीत आपला ऑर्केस्ट्रा होवू शकतो.”

“ही तर खूप चांगली सूचना आहे,” हनी बनी बंको म्हणाला. “चला, सगळेजण बैठकीत या.” सगळेजण बैठकीत आले आणि एक साथ संगीत वाजवू लागले.

‘डम डम! चीं चीं! काँ काँ! ब्ला ब्ला!’ खूप भीतीदायक आवाज ऐकू येवू लागला.

“थांबा!” मिल्ली बी. ओरडली. “मी हे सहन करू शकत नाही!” तिने उशी उचलून आपल्या डोक्यावर ठेवली.

“मला वाटतं काहीतरी गडबड आहे,” हनी बनी बंको म्हणाला.

मिल्ली बी. ने डोक्यावरची उशी काढली. “काहीतरी गडबड आहे,” तो म्हणाला. “आणि मला माहित आहे काय गडबड झाली ते, तुम्ही सगळेजण एक साथ वेगवेगळी गाणी वाजवत आहात. तुम्ही सगळ्यांनी एकच गाणं वाजवलं पाहिजे.”

“ओह,” हनी बनी बंको म्हणाला

“ओह,” पंधरा मुलं म्हणाली.



मिल्ली बी. उभी राहिली. “तुम्ही सगळे मांजर पळाली शेपूट पकडून,” ती म्हणाली. “मी इथं समोर उभी राहून हात हलवत तुम्हांला खुणा करेन, त्यामुळे तुम्हांला कळेन किती जोरात व किती हळू वाजवायचं आहे.”

तिने आपले हात हलवले आणि सगळेजण, “मांजर पळाली शेपूट पकडून” हे गाणं वाजवू लागले. आता खूप मधुर संगीत ऐकू येत होते.

गाणं संपताच हनी बनी बंको धावत मिल्ली बी. जवळ आला आणि तिला जवळ घेतलं. “तू खरंच सगळ्यात चांगली श्रोता आहे,” तो म्हणाला. “आणि तू सगळ्यात चांगली पत्नी आहे.”

मिल्ली बी. ने त्याला जवळ घेतलं. “तू सुद्धा एक चांगला नवरा आहे,” ती म्हणाली. “चला, अजून गाणी वाजवू या.”





## हनी बनी बंकोची राजाशी भेट

खूप वर्षे निघून गेली. शेतीवाडी करता-करता हनी बनी बंकोचे मन भरून गेले. आता शेती करणे नको झाले.त्याला सतत फक्त संगीत वाजवावे वाटे.पण त्याला माहित नव्हते अशी नोकरी कुठे मिळू शकते?

एका सकाळी नाष्ट्याकडे बघत तोंड वेंगाडत तो म्हणाला, “उफ़! आज मन खूप अस्वस्थ आहे.”

“असं आहे?” मिल्ली बीने विचारले. “काय झालं?”

“खूप थकल्यासारखे होत आहे,” हनी बनी बंको म्हणाला. “आणि मला ताप आहे असं वाटतं आहे.”

“बिचारा हनी बनी बंको!” मिल्ली बी. म्हणाली. “तुला नेहमीच संगीत वाजवावे वाटते, पण घाबरू नकोस, सगळे ठीक होईल.”

“छे,” हनी बनी बंको म्हणाला. मग त्याने वर्तमानपत्र उघडले आणि वाचू लागला. त्याचे तोंड उघडे ते उघडेच राहिले. “बघ, मिल्ली बी.!” तो ओरडला. “इथं लिहलं आहे की राजा आजारी आहे. त्यांना दिवसभर अंथरूणावर पडून राहावं लागतं. त्याचे मन कसंहीकरून लागत नाही.”

“किती वाईट झालं!” मिल्ली बी. म्हणाली. “बिचारा राजा”


“अरे, मला माहित आहे की मला काय करायचं आहे,” हनी बनी बंको म्हणाला. “मला तिथं जावून त्यांच्यासाठी संगीत वाजवावं लागेल. संगीत ऐकून त्यांना चांगलं वाटेल.”

त्याने आपलं फिडेल एका पिशवीत घातलं आणि महालाकडे तो निघाला. मिल्ली बी. ने हात हलवत त्याला अच्छा केलं. “चिंता करू नको,” ती म्हणाली, “सगळं ठीक होईल.”

पण जेव्हा हनी बनी बंको महालाजवळ पोहचला तेव्हा पहारेकरीने त्याला आत जाऊ दिले नाही. “निघ इथून?” तो म्हणाला. “राजा इतका आजारी आहे की तो तुला भेटू शकत नाही.”

“त्यांना बरं वाटेल असा प्रयत्न मी करेन.” हनी बनी बंको म्हणाला. पण पहारेकऱ्याने दरवाजा जोरात बंद केला.

“उफ़,” हनी बनी बंको विचार करू लागला. “आत जाण्यासाठी आता मलाच एखादा नवीन रस्ता शोधून काढावा लागेल. राजाला माझी गरज आहे.”



तेव्हा त्याने एक गाडी महालाच्या फाटकाजवळ उभी राहिलेली पाहिली. ती गाडी राजाच्या घोड्यासाठी घास आणण्यासाठी होती. “आहा!” हनी बनी बंको म्हणाला. तो गाडीवर चढला आणि घासात लपला. गाडी फाटकाच्या आत गेली आणि अशा तऱ्हेने तो आत पोहचला.

घासात त्याला शिंका येवू लागल्या आणि त्याचा ताप वाढला. पण त्याने त्याची पर्वा केली नाही. तो महालात गेला.

हनी बनी बंको, राजाच्या झोपण्याच्या खोली पर्यंत शिंकत गेला. तेव्हा त्याची मुलाखत दुसऱ्या पहारेकऱ्याशी गाठ पडली.



“निघ इथून,” पहारेकरी म्हणाला. “राजा इतका आजारी आहे की तुला भेटू शकणार नाही.”

“मी माझ्या संगीताने त्यांचं मन रिझवू इच्छितो,” हनी बनी बंको म्हणाला.


“मुर्खासारखे वागू नको,” पहारेकरी म्हणाला.

त्याचं बोलणं ऐकून हनी बनी बंकोला राग आला. तो पहारेकऱ्याला सांगू इच्छित होता की त्याचं संगीत मूर्खपणाचे नाही.

पण त्याऐवजी हनी बनी बंकोला एक जोरदार शिंक आली, खूप जोरात शिंक आली.

छीं शिंक एवढी जोरात होती की पहारेकरी उडून हॉलच्या दुसऱ्या बाजूला पोहचला आणि मग खिडकीच्या बाहेर आला.पक्ष्यांसाठी केलेल्या जलकुंडात पडला.

हनी बनी बंको हसला. मग त्याने आपलं नाक साफ केलं आणि राजाच्या झोपण्याच्या खोलीत तो आला.



खोलीत एक मोठा पलंग होता ज्याच्या चारी बाजूला पडदे लावले होते. पडद्याच्या आत कोणी व्यक्ती कण्हत होता. “बिचारा राजा,” हनी बनी बंकोने विचार केला. “मी त्यांना अभिवादन पण करणार नाही, फक्त माझं संगीत ऐकवेन.”





त्याने आपलं फिडेल घेतलं आणि वाजवू लागला. त्याने ‘माझ्या कानांत घास’ हे गाणं वाजवलं. कण्हचा आवाज बंद झाला.

मग त्याने ‘शिंकेने उडवला पहारेकरी’ हे गाणं वाजवलं. पडद्याच्या आत कोणी हळूहळू हसत होते..

त्याने ‘राजा की जयजयकार’ गाणं वाजवलं.

“वाह!” पडद्याच्या मागून आवाज आला. “मला वाटतं की एकतर माझा मृत्यू झाला आहे आणि मी स्वर्गात पोहचला आहे किंवा मी हनी बनीचे संगीत ऐकत आहे.”

हनी बनी बंको त्या आवाजाला ओळखत होता. पण त्याने अंदाज लावण्याच्या आधीच पडदा उघडला आणि म्हातारा भटका माणूस उडी मारून बाहेर आला. पण आता तो दरिद्री अवस्थेत नव्हता. त्याने बेंगनी रंगाचे कपडे आणि सोन्याचा मुकुट घातला होता.



“हे तर तुम्ही आहात!” हनी बनी बंको म्हणाला.


“हो हा मी आहे!” राजा म्हणाला. “मला तू आवडत होता, हनी बनी बंको. पण आता तू मला अधिकच प्रिय आहे. तू मला परत चांगलं केलंस.”

“ही तर चांगली गोष्ट आहे,” हनी बनी बंको म्हणाला. “मलाही तुम्ही आवडतात.”

“मग तर” राजा म्हणाला. “माझ्या विचारानुसार तू महालात येवून राहायला हवं म्हणजे मी नेहमी तुझं संगीत ऐकू शकेल.”

“मिल्ली बी. पण येवू शकते का?” हनी बनी बंकोने विचारलं. “आणि माझी पंधरा मुलं?”

“बेलाशक,” राजा म्हणाला. “सगळ्यांना घेवून ये. आता मला दुसरे एखादे गाणं ऐकव.”



हनी बनी बंकोने थोड्यावेळ विचार केला. मिल्ली बी. ने जे काही सांगितलं होतं ते त्याला आठवलं. मग त्याने आपल्या मनातलं गाणं ऐकलं. जेवढे त्याने आजपर्यंत मनातली गाणी ऐकली होती त्यात ते सगळ्यात सुंदर होते. ते गाणं होतं, "सगळं काही ठीक आहे" हनी बनी बंकोने हे गीत वाजवून राजाला ऐकवलं.

**समाप्त**

